**नि.फौ.ख. क्र. ३४४/२०२५**

**निशाणी क्र. २५**

सरकार तर्फे **साक्षीदार क्रमांक.** ०१.

देवाशपथ खरे सांगतो की,

नावः– सुरज अशोक गुंजाळ

वयः– ३३ वर्षे, व्यवसायः– पो शि. ब.नं.२९५१.

रा. वालचंदनगर पोलीस स्टेशन, जि.पुणे.

**सरतपास सरकारतर्फे सरकारी वकिल श्री एम.डी.करे यांच्यामार्फत सुरुः–**

दिनांक १५/०८/२०२४ रोजी इंदापूर पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी पोलीस निरीक्षक कोकणे यांना फोनवरुन अशी बातमी मिळाली की, हिंगणगावपाटी एक पांढ–या रंगाचा टाटा एंट्रा वाळू भरुन कांगणगावहून हिंगणगावपाटी कडे येत आहे. त्यानंतर मी, पोलीस कॉन्स्टेबल गरड, पोलीस कॉन्स्टेबल मुलाणी असे मिळून पोलीस निरीक्षक यांचे सांगणेवरून खाजगी वाहनाने हिंगणगाव पाटी येथे गेलो. त्याठिकाणी आम्हाला टाटा एंट्रा हे वाहन येताना दिसले. त्यामध्ये पुढे दोन व्यक्ती बसले होते. आम्ही वाहनास थांबविण्याबाबत इशारा केला मात्र चालकाने वाहन थांबविले नाही. चालकाने सदर वाहन हिंगणगाव येथील मंदिरासमोर घराजवळ उभे केले. त्यानंतर वाहनातील दोन्ही व्यक्ती पळून गेले. आम्ही त्याबाबत फोन करुन पोलीस निरीक्षक कोकणे यांना सांगितले. त्यांनी आम्हाला वाहन वाळूसह पोलीस ठाणेस आणणेस सांगितले. त्यानंतर आम्ही वाहन वाळूसह पोलीस ठाणेत नेले. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २६** देण्यात येते. आता मला प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. त्यास **निशाणी २७** देण्यात येते. सदर वाहनाचा क्र. एम. एच. ४२ बी. एफ. ५५६२ असा होता. मी आरोपींना पाहिले होते. मला आरोपींचे नाव तपासी अधिकारी यांचेकडून समजले. त्यांची नावे सोलनकर व बघाडे अशी आहेत. आरोपींना दाखविल्यास मी ओळखू शकतो. आरोपी क्र. १ आज न्यायालयात हजर आहे. (आरोपी क्र.२ चा हजेरी माफीचा अर्ज **निशाणी २४** कडे मंजूर.)

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे वकिल श्री. खताळ यांच्यामार्फतः–**

अर्ज **निशाणी २८** वरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

**उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे वकिल श्री. आर. आर. शुक्ल यांच्यामार्फतः–**

अर्ज **निशाणी २९** वरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2026.06.24 15:41:48 +0530

दिनांकः२४/०६/२०२६ (प्र.चं.बारटक्के)

ठिकाण – इंदापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.